RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक ७१] सोमवार, जून ८, २०२६/ज्येष्ठ १८, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक २२७

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ५ जून २०२६.

अधिसूचना

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनःस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक आरपीए-२०२५ / ई-ऑफिस क्र. १६७२१८३ / पुनर्वसन-१.— ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनःस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०), याच्या महाराष्ट्र राज्यास लागू असलेल्या तरतुदींतील कलम ५२, ५३ आणि ५४ अन्वये, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनःस्थापना प्राधिकरणाच्या पीठासीन अधिकाऱ्याची नियुक्ती महाराष्ट्र शासनाकडून मा. मुंबई उच्च न्यायालयाचे मा. मुख्य न्यायमूर्ती यांच्याशी विचारविनिमय करून करण्यात येते आणि कलम ५४ नुसार पीठासीन अधिकाऱ्याचा कार्यकाळ हा त्यांनी पदाचा कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून तीन वर्षे किंवा त्यांनी वयाची पासष्ठ वर्षे पूर्ण करेपर्यंत, यापैकी जे अगोदर असेल तेवढा राहतो;

आणि ज्याअर्थी, श्री. मोहम्मद सादिक मोहम्मद उमर, निवृत्त जिल्हा न्यायाधीश, हे भूमी संपादन, पुनर्वसन व पुनःस्थापना प्राधिकरण, नागपूर येथील पीठासीन अधिकारी म्हणून कार्यरत असून त्यांना मंजूर असलेली विद्यमान मुदतवाढ दिनांक ३० जून २०२६ रोजी समाप्त होत आहे;

आणि ज्याअर्थी, प्रशासकीय निकड, कामकाजातील सातत्य, सदर अधिनियमाच्या कलम ६४ अंतर्गत दाखल संदर्भ प्रकरणांची प्रलंबितता, तसेच प्रस्तुत प्रकरणात वयोमर्यादा व कार्यकाळाच्या अटी शिथिल करण्याचा शासनाचा निर्णय, या बाबी विचारात घेता, त्यांना पुढील मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

म्हणून, आता, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनःस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०), याच्या महाराष्ट्र राज्यास लागू असलेल्या तरतुदींतील कलम ५२, ५३ आणि ५४ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे श्री. मोहम्मद सादिक मोहम्मद उमर, निवृत्त जिल्हा न्यायाधीश, यांच्या बाबतीत वयोमर्यादा व कार्यकाळाच्या अटी शिथिल करीत असून, त्यांना त्यांच्या विद्यमान अटी व शर्तींच्या अधीन राहून, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनःस्थापना प्राधिकरण, नागपूर येथील पीठासीन अधिकारी म्हणून दिनांक १ जुलै २०२६ ते दिनांक ३० जून २०२८ या कालावधीसाठी पुढील दोन वर्षांची मुदतवाढ देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

संजय इंगळे,
शासनाचे सह सचिव.

REVENUE AND FOREST DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,
dated 5th June 2026.

NOTIFICATION

THE RIGHT TO FAIR COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION, REHABILITATION AND RESETTLEMENT ACT, 2013.

No. RPA-2025 / E-Office No. 1672183 / P-1.— Whereas, under sections 52, 53 and 54 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013), in its application to the State of Maharashtra, the Presiding Officer of the Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Authority is appointed by the State Government in consultation with the Chief Justice of the Bombay High Court, and section 54 provides that the term of office is three years from the date on which the Presiding Officer enters upon office or until he attains the age of sixty-five years, whichever is earlier;

And whereas, Shri Mohd Sadiq Mohd Umar, Retired District Judge, is serving as the Presiding Officer, Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Authority, Nagpur, and his present tenure is up to 30th June 2026;

And whereas, considering the administrative exigency, continuity of judicial work, pendency of references under section 64 of the said Act, and the decision of Government to relax the age and tenure conditions in the present case, it is considered necessary, to extend his tenure further.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sections 52, 53 and 54 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013), in its application to the State of Maharashtra, the Government of Maharashtra hereby relaxes the age and tenure conditions in the case of Shri Mohd Sadiq Mohd Umar, Retired District Judge, and extends his tenure as the Presiding Officer, Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Authority, Nagpur, for a further period of two years with effect from 1st July 2026 to 30th June 2028, on the existing terms and conditions.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY INGLE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.